**शिक्षण मंडळ कराड, संचालित**

**महिला महाविद्यालय कराड**

# अर्थशास्त्र विभाग

## विषय - स्थूल/समग्रलक्षी अर्थशास्त्र पेपर II

## Macro Economics

## बी.कॉम भाग - II 2021-22

## General Ability Test

**गुण - 30**

1) समग्रलक्षी अर्थशास्त्र हे व्यक्तिगत घटकांचा अभ्यास करीत नाही तर मोठ्या समुच्यात्मक बाबींचा अभ्यास करते हे………...यांचे विधान आहे.

अ) प्रा. बोल्डिंग ब) अँडम स्मिथ क) एच रॉबर्टसन ड) जे.एम केन्स

2) स्थूल अर्थशास्त्रात………...घटकांचा समग्र पातळीवर अभ्यास केला जातो.

अ) लहान ब) मोठ्या क) अति लहान ड) अति मोठ्या

3) ज्या अर्थशास्त्राच्या शाखेत मोठ्या समुच्यात्मक घटकांचा अभ्यास केला जातो ती अर्थशास्त्राची शाखा म्हणजे……….होय.

अ) सूक्ष्म अर्थशास्त्र ब) स्थूल अर्थशास्त्र क) विकासाचे अर्थशास्त्र ड) श्रमाचे अर्थशास्त्र

4) एका वर्षाच्या कालावधीत देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवा यांचे पैशात काढलेले मूल्य म्हणजे…….. होय.

अ) स्थूल देशांतर्गत उत्पादन ब) निव्वळ राष्ट्रीय उत्पादन क) स्थूल राष्ट्रीय उत्पादन ड) स्थूल दरडोई उत्पन्न

5) …………...वरून संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना येते.

अ) सूक्ष्म अर्थशास्त्र ब) स्थूल अर्थशास्त्र क) विकासाचे अर्थशास्त्र ड) श्रमाचे अर्थशास्त्र

6) देशातील विविध आर्थिक समस्यांचे आकलन होण्यासाठी समग्रलक्षी अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

अ) सूक्ष्म अर्थशास्त्र ब) समग्रलक्षी अर्थशास्त्र क) विकासाचे अर्थशास्त्र ड) श्रमाचे अर्थशास्त्र

7) ठराविक कालखंडात देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांचे केलेले मापन म्हणजे………..होय.

अ) दरडोई उत्पन्न ब) राष्ट्रीय उत्पन्न क) व्यक्तिगत उत्पन्न ड) सार्वजनिक उत्पन्न

8) स्थूल देशांतर्गत उत्पन्न = देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवा +......................

अ) निर्यात - आयात ब) आयात - निर्यात क) निर्यात+आयात ड) आयात + निर्यात

9) राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन…………. वर्षांनी केले जाते.

अ) पाच ब) तीन क) एक ड) चार

10) ...........पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना देशातील व्यक्ती व संस्था यांनी प्राप्त केलेल्या निव्वळ उत्पन्नाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्नाची मापन केले जाते.

अ) उत्पन्न ब) उत्पादन क) खर्च ड) वरीलपैकी सर्व

11) राष्ट्रीय उत्पन्न हे नेहमी……...स्वरूपात व्यक्त केले जाते.

अ) वस्तुच्या ब) पैशाच्या क) आकडेवारीच्या ड) वरीलपैकी सर्व

12) स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना………... वस्तू व सेवांचे मूल्य विचारात घेतले जाते.

अ) अंतिम ब) प्राथमिक क) अंतःस्थ ड) दुय्यम

13) स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातून घसारा वजा केला असता जे उत्पन्न मिळते त्यास…………..असे म्हणतात.

अ) निव्वळ दरडोई उत्पन्न ब) निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न क) निव्वळ व्यक्तिगत उत्पन्न ड) निव्वळ सार्वजनिक उत्पन्न

14) राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यासाठी पुढील पद्धतींचा उपयोग केला जातो.

अ) उत्पादन ब) उत्पन्न क) खर्च ड) वरीलपैकी सर्व

15) राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग कशासाठी केला जातो.

अ) आर्थिक नियोजनासाठी ब) आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी क) उत्पन्नांच्या विभाजनाचा अभ्यास करण्यासाठी ड) वरीलपैकी सर्व